आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक वृत्त विभाग
प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)
शनिवार दिनांक २३ नोव्हेंबर २०२४
ठळक बातम्या

- विधानसभा निवडणूक निकालांमध्ये महायुतीला मतदारांची पसंती, २२९ जागांवर आघाडी.
- अडीच वर्षे महायुती सरकारने केलेल्या कामांची पोचपावती जनतेने दिली - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची विधानसभा निकालांवर प्रतिक्रिया.
- नागपूर जिल्ह्यात भाजप ठरला सर्वात मोठा पक्ष, १२ पैकी ९ ठिकाणी महायुतीच्या उमेदवारांची सरशी.
- विदर्भात देखील महायुतीला अभूतपूर्व यश; २०१९ च्या तुलनेत भाजपच्या जागा वाढल्या.

प्रतिक्रिया/एकनाथ शिंदे /गडकरी /फडणवीस/अजित पवार राज्याच्या विधानसभा निवडणुकीत महायुतीला अभूतपूर्व यश मिळालं आहे. सुमारे २२९ जागांवर महायुतीचे उमेदवार आघाडीवर आहेत.

विधानसभा निवडणुकीत महायुतीला ऐतिहासिक जनादेश दिल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महाराष्ट्रातील जनतेचे, विशेषत: राज्यातील तरुण आणि महिलांचे आभार मानले आहेत. ही आपुलकी आणि जिव्हाळा अतुलनीय असल्याचे ते म्हणाले., राज्यात विकास आणि सुशासनाचा विजय झाला आहे. महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी युती कार्यरत राहील, अशी ग्वाही त्यानी समाज माध्यमावरील एका संदेशातून दिली आहे.

अडीच वर्षे महायुती सरकारने केलेल्या कामांची पोचपावती जनतेने दिली आहे. लाडकी बहीण, लाडका भाऊ, लाडका शेतकरी आणि लाडक्या ज्येष्ठ नागरिकांनी महायुतीला साथ दिल्याने महायुतीला अभूतपूर्व विजय दिल्याची भावना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज निकालांवर बोलताना व्यक्त केली. विधानसभेतील निकालानंतर महायुतीच्या नेत्यांबरोबर संयुक्त पत्रकार परिषदेत मुंबईत ते बोलत होते यावेळी त्यांनी महायुतीने विकासाला प्राधान्य दिले असल्याचं सांगितलं

*जे निर्णय आम्ही घेतले ते निर्णय आतापर्यंतच्या इतिहासामध्ये न भूतो न भविष्यति असे होते, पण एकीकडे विकास केलं. आम्ही डेव्हलोपमेंट म्हणजे जे अडीच वर्षात महाविकास आघाडी सरकार ने जे काही काम बंद पडली होती, सगळे काम थांबवली होती, आणि ते स्टे आम्ही सगळे काढले आणि काम सुरु झाली. मग अटल सेतू झाला, समृद्धी झाला, आपला कोस्टल झाला, आणि मेट्रो झाली, कार शेड झालं आणि मोदी साहेबांच्या शुभहस्ते त्याचा आम्ही उदघाटनहि करू शकलो आणि त्यामुळे कामाला प्राथमिकता दिली. विकासाला आम्ही प्राधान्य दिले.*

दरम्यान, पुढील मुख्यमंत्री पदाबाबत महायुतीचे प्रमुख नेते एकत्र बसून निर्णय घेतील, असेही मुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

राष्ट्रद्रोही विचार विरोधात लढणाऱ्या राष्ट्रीय विचारांच्या संघटनांचा हा विजय असल्याचं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मुंबईत माध्यम प्रतिनिधींशी बोलताना सांगितलं महाराष्ट्राच्या जनतेपुढे आम्ही नतमस्तक आहोत असंही फडणवीस यावेळी म्हणाले.

*आणि मोदीजींनी जो नारा दिला होता 'एक है तो सेफ है' महाराष्ट्रातल्या सर्व समाजातल्या लोकांनी एकत्रित येऊन हा नारा यशस्वी केलेला आहे. सगळ्यांनी एकत्रित मतदान केलेल आहे. आणि विशेष आभार आमच्या लाडक्या बहिणींचे देखील आहे कि ज्यांनी आम्हाला खूप आशीर्वाद दिलेलं आहे आणि निश्चितच महाराष्ट्राच्या जनतेपुढे आम्ही नतमस्तक आहेत.*

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस आणि महायुतीला मिळालेले अभूतपूर्व यश हे राज्यातील जनतेने महायुतीच्या विकासकामे तसेच, पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या सक्षम नेतृत्वावर व्यक्त केलेल्या विश्वासाचे प्रतिक आहे अशी प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी निवडणूक निकालावर दिली आहे.

दरम्यान, महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्ष-महायुतीला मिळालेल्या महाविजयासाठी महाराष्ट्रातील जनतेचे हृदयपूर्वक अभिनंदन आणि मनःपूर्वक आभार करतो असा संदेश केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी समाज माध्यमावरून दिला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भाजप-महायुतीने नेहमीच विकासाला प्राधान्य दिलं आहे असंही ते म्हणाले.

राज्यातील प्रमुख लढती

शिवसेना शिंदे गटाचे प्रमुख एकनाथ शिंदे हे ठाणे जिल्ह्यातील कोपरी पाचपाखाडी मतदारसंघातून १ लाख २० हजार ७१७ मतांनी विजयी झाले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे प्रमुख अजित पवार हे बारामती मतदार संघातून जवळपास एक लाख मतांनी विजयी झाले आहे.

याशिवाय माहीम मतदारसंघातून शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे **महेश सावंत** विजयी झाले आहे. मनसेचे राज ठाकरे यांचे पुत्र अमित ठाकरे ३३ हजार ६२ मते घेऊन तिसऱ्या स्थानी आहे.

नंदुरबारमधून भाजपचे **डॉ.विजय कुमार गावित** सुमारे ७६ हजार मतांनी विजयी झाले आहे. शिर्डी विधानसभा मतदारसंघ महायुतीचे **राधाकृष्ण विखे** पाटील विजयी झाले आहे. नाशिक जिल्ह्यातील मालेगाव बाह्यमधून शिवसेना शिंदे गटाचे **दादा भुसे** आणि येवल्यातून **अजित पवार** गटाचे छगन भुजबळ विजयी झाले आहे.

काँग्रेसचे **बाळासाहेब थोरात** यांचा संगमनेर मधून पराभव झाला आहे. याठिकाणी शिवसेना शिंदे गटाचे अमोल खटाळ यांनी १० हजार ५६० मतांनी त्यांचा पराभव केला. इस्लामपूर मधून राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे **जयंत पाटील** हे १३ हजार २७ मतांनी विजयी झाले आहे.

बीड जिल्ह्यातील परळी मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे **धनंजय मुंडे** 1लाख 40 हजारांपेक्षा अधिक मताधिक्याने विजयी झाले आहे.
रत्नागिरी मतदारसंघातू शिवसेना शिंदे गटाचे **उदय सामंत** ४१हजार पेक्षा अधिक मतांनी मतांनी विजयी झाले आहे.

दक्षिण कराडमधून माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेसनेते पृथ्वीराज चव्हाण हे भाजपच्या डॉ.अतुलबाबा भोसले यांच्या कडून ३९ हजार ३५५ मतांनी पराभूत झाले आहे.

साकोली मध्ये काँग्रेस चे प्रदेशाध्यक्ष २५ व्य फेरी अखेर १६०० मतांनी पिछाडीवर आहे, तर ब्रह्मपुरी मधून काँग्रेसचे **विजय वडेट्टीवार** १२ हजार पेक्षा अधिक मतांनी आघाडीवर आहे. अनेक मतदार संघामध्ये मतमोजणी अद्याप सुरु आहे.

नागपूर मतदारसंघ निहाय निकाल
नागपूर शहराच्या ६ मतदारसंघामध्ये ४ ठिकाणी महायुतीचे उमेदवार आघाडीवर आहे. नागपूर दक्षिण पश्चिम मतदार संघातून भाजपाचे देवेंद्र फडणवीस सुमारे ३८ हजार पेक्षा अधिक मतांनी जिंकले आहे. नागपूर पश्चिम मधून काँग्रेसचे विकास ठाकरे 6 हजार मतांनी जिंकले आहे. नागपूर दक्षिण मधून भाजपचे मोहन मते आघाडीवर आहे. नागपूर उत्तर मधून काँग्रेसचे डॉ नितीन राऊत सुमारे २५ हजार मतांनी आघाडीवर आहे. नागपूर पूर्वमधून भाजपचे कृष्णा खोपडे ८० हजार मतांनी  आघाडीवर आहे. नागपूर-मध्य मध्ये भाजपचे प्रवीण दटके १० हजार मतांनी आघाडीवर आहे. नागपूर ग्रामीण मधील ६ मतदारसंघामध्ये ५ ठिकाणी महायुतीचे उमेदवार आघाडीवर आहे. हिंगणा मधून भाजपचे समीर मेघे ६८ हजार मतांनी आघाडीवर आहे. कामठी इथं भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे विजयी झाले आहे. काटोल मतदार संघात भाजपचे चरणसिंग ठाकूर सुमारे ३१ हजार मतांनी  आघाडीवर आहे. सावनेरमध्ये भाजपचे डॉ आशिष देशमुख २६ हजार मतांनी  आघाडीवर आहे. उमरेड मध्ये काँग्रेसचे संजय मेश्राम सुमारे १२ हजार ८२५ मतांनी विजयी झाले आहे. तर रामटेक मध्ये शिवसेना शिंदे गटाचे आशिष जैस्वाल २६ हजार ५५५  मतांनी विजयी झाले आहे.

उर्वरित विदर्भ-मतदारसंघ निहाय निकाल
विदर्भातील प्रमुख लढती पाहता **बुलढाणा** जिल्ह्यात ७ पैकी ५ जागांवर महायुतीचे उमेदवार विजयी झाले आहे. बुलढाणा जिल्ह्यात मतदारसंघ निहाय लढती बघता मलकापूर इथं भाजपचे पक्षाचे चैनसुख संचेती विजयी झाले आहे. बुलढाणा  इथं शिवसेना शिंदे गटाचे  पक्षाचे संजय गायकवाड  विजयी झाले आहे. चिखली इथं भाजपच्या श्वेता महाले विजयी झाले आहे. सिंदखेड राजा इथं राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे मनोज कायंदे विजयी झाले आहे. मेहकर इथं शिवसेना ठाकरे गटाचे  सिद्धार्थ खरात विजयी झाले आहे. खामगांव इथं भाजपचे  आकाश फुंडकर विजयी झाले आहे. जळगाव (जामोद) इथं भाजपचे डॉ संजय कुटे विजयी झाले आहे.

**अकोला** जिल्ह्यात ५ पैकी ३ जागांवर महायुतीचे पक्षाचे उमेदवार आघाडीवर आहे.

**अकोला** जिल्ह्यात मतदारसंघ निहाय लढती बघता अकोला पश्चिम इथं काँग्रेसचे साजिद खान विजयी झाले आहे. अकोला पूर्व इथं भाजपचे रणधीर सावरकर विजयी झाले आहे.

**वाशिम** जिल्ह्यात ३ पैकी २ जागांवर महायुतीचे उमेदवार आघाडीवर आहे. रिसोड इथं शिंदे गटाच्या भावना गवळी यांना हरवून काँग्रेस चे अमित झनक विजयी झाले आहे. वाशिम इथं भाजपचे श्याम खाडे विजयी झाले आहे.

**अमरावती** जिल्ह्यात ८ पैकी ७ जागांवर महायुतीचे उमेदवार विजयी झाले आहे. **धामणगाव** रेल्वे मतदारसंघात भाजपचे प्रताप अडसड विजयी झाले आहे. बडनेरा मतदारसंघात युवा स्वाभिमान पक्षाचे रवी राणा विजयी झाले आहे. अमरावती मतदारसंघात अजित पवार गटाच्या सुलभ खोडके विजयी झाले आहे. **तिवसा** मतदारसंघात भाजपचे राजेश वानखेडे विजयी झाले आहे. **दर्यापूर** मतदारसंघात शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे गजानन लवटे विजयी झाले आहे. **मेळघाट** मतदारसंघात भाजपचे केवलराम काळे विजयी झाले आहे. **अचलपूर** मतदारसंघात भाजपचे प्रवीण तायडे विजयी झाले आहे. **वरुड - मोर्शी** मतदारसंघात भाजपचे उमेश यावलकर विजयी झाले आहे.

**वर्धा** जिल्ह्यात ४ पैकी ४ ही जागांवर महायुतीचे भाजपचे उमेदवारानीं विजयी आघाडी मिळवली आहे.

**भंडारा** जिल्ह्यात ३ पैकी २ जागांवर महायुतीचे उमेदवार पुढे आहे.

**गडचिरोली** जिल्ह्यात ३ पैकी २ जागांवर महायुतीचे उमेदवार विजयी झाले आहे.

दरम्यान, या निवडणुका म्हणजे वन नेशन वन पार्टी असा आहे अशी प्रतिक्रिया शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी मुंबईतील मातोश्री निवासस्थानी आयोजित पत्रकार परिषदेत व्यक्त केली.

*सांगायची गरजचं नाही अशे आकडे आहेत. थोडक्यात विरोधी पक्षात जणूकाही शिल्लक ठेवायचे नाही आणि एक दीड वर्षांपूर्वी भारतीय जनता पक्षाचे असलेले अध्यक्ष जे पी नड्डा जे बोलले होते कि एकच पक्ष राहील म्हणजे आता वन पार्टी, वन नेशन वन इलेक्शन आणि वन पार्टी या देशाने आपले आगेकूच आहे असे भीतीदायक चित्र आहे.*